**रे. मु. नं. ६१/२०२४**
**सुनिल वि. शाम**
**निशाणी २० खाली**

**<u>वादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ सुनिल रामदास खांडेकर याची उलटतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. जी. वडाळकर यांच्यामार्फत</u> —**

२. वाद मिळकत गट क्र. १३१ व त्याच्या पश्चिमेला असलेले गट क्र. १३० व १२८ ह्या तिन्ही मिळकती माझ्या आजोबा बुलारामजी खांडेकर यांच्या होत्या. माझे आजोबा यांनी सदर तिन्ही शेत मिळकती त्यांची मुले रामदास व वासुदेव यांना वहितीसाठी दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १३१ मधुन उत्तर—दक्षिण असा पाण्याचा नाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर नाल्याच्या पुर्व व पश्चिम काठांवर झाडे उगवलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर नाल्याच्या पुर्वेकडील भाग माझ्या वडिलांच्या काळापासुन वाहत आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, माझी वहिती नाल्याच्या पश्चिमेकडील भागात देखील आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने नाल्याच्या पश्चिमेकडील भागात अतिक्रमण केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेत गट क्र.१३० व १२८ यांची वहिती माझ्या वडिलांच्या काळापासुन सदर नाल्याच्या पुर्वेकडील काठापर्यंत होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी माझ्या शेतात अतिक्रमण केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोजणीदाराशी संगनमत करून प्रतिवादींनी माझे शेतात अतिक्रमण केले असे मोजणीदाराला दर्शविण्यास लावले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.
**स्वा/—**

दि. १५.०७.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट २रे सह दिवाणी न्यायाधीश,
अकोट, जि. अकोला.